**<u>नि. फौ. खटला क्र.४७/२०२०</u>**

**<u>निशाणी क्र.६४</u>**

**:: <u>आरोपीकरिता विधीज्ञ श्री. एम.बी. बिरादार यांच्यामार्फत शपथेवर उलटतपास सुरू</u> ::**

०२. मी आणि आरोपी घराचे शेजारी आहोत. आरोपीचे घर समोर आणि आमचे घर पाठीमागे आहे. आरोपीच्या घराची जागा २० x ४२ फूट असल्याचे मला माहीत नाही.

प्रश्न – आरोपींनी तुमची जागा सोडून तीन फूटानंतर बांधकाम केलेले आहे ?

उत्तर – जागा मोजून घ्या.

०३. आरोपीच्या घरासमोर रस्ता आहे. त्याच्या बाजूला सांडपाणी वाहण्यासाठी नाला आहे. हे म्हणणे खरे आहे की, पावसाचे पाणी आणि आरोपीच्या घरातील पाणी सदर नाल्याने वाहत जाते. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या घराचे सांडपाणी आमच्या घराकडे येत नाही. आमचा आरोपीसोबत जागेचा वाद नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र.२ व ३ हे पुणे येथे राहतात. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.४ घटनेच्या वेळी आजारी होती व शरीराने थकली होती.

प्रश्न – आरोपी क्र.१ चे वय झालेले आहे ?

उत्तर – तो माझ्यापेक्षा १५–२० वर्षाने लहान आहे.

०४. माझ्या घरासमोर रस्ता आहे व त्याच्या बाजूला नाला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझी पत्नी नाल्यात पडली आणि मला दुखापत झाली. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही सदर दुखापतीचा गैरफायदा घेऊन खोटी खबर दिली आणि खोटी साक्ष दिली. हे म्हणणे खरे नाही की, मी सरतपासामध्ये नमूद घटनेच्या अनुषंगाने खोटे कथन केले आणि खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**.

( श.अ. सुरजुसे )
न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, **<u>दे व णी</u>**.

दि. ३१/१०/२०२५.